# उत्सवांचे उत्साही आम्ही

उत्सवांचे उत्साही आम्ही, जरा आवरतं घ्यायला हवं |

उत्साहात उत्सवांचं पसरणं, आता तरी थांबवायला हवं ||

देश म्हणून पुढे यायचं, तर कामांमागे लागायला हवं |

देश खचतोय ह्याकडं, गंभीरपणे पाहायला हवं ||

गरीबी - शोषण - विषमता, यांच्याशी लढायला हवं |

गरीब - स्त्री - बालकांचं, जीवन नवं घडायला हवं ||

स्वार्थसंबंधी राजकारणाला, जमिनीत गाडायला हवं |

माणसा-माणसांना प्रेमाने, देशासाठी जोडायला हवं ||

चंगळवादी नि विदेशी यांना, कायमचं सोडायला हवं |

देशी आणि ग्रामीण वस्तूंना, घराघरांशी जोडायला हवं ||

श्रम करत, श्रमिकांसाठी, श्रमासाठी जगायला हवं |

देशासाठी देवालाही, सरळ दूर ठेवायला हवं ||

उत्सवांचं वाढतं पीक, पार कापून टाकायला हवं |

उत्साहाचं सारं बळ, कामासाठी राखायला हवं ||